RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - ४८ ] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर २ - ८ , २०२१ / अग्रहायण ११ -१७, शके १९४३ [ पृष्ठे १६

## प्राधिकृत प्रकाशन

## संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### जिल्हाधिकारी तथा समुचित प्रशासन यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ नुसार अधिसूचना.**

**जिल्हा जळगाव**

क्रमांक भूसंपादन/मौजे रामपूरा/एसआर-२४१/२०१८.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक भूसंपादन/मौजे रामपूरा/एसआर-२४१/२०१८, दिनांक ३१ मे २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची " एक " मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची " दोन " मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, जळगाव यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल (कोणताही असल्यास) विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे; आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची " तीन " मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची " चार " मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव यांना पदनिर्देशित करीत आहेत.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

**जिल्हा जळगाव, तालुका जामनेर, मौजे रामपूरा**

| भूमापन किंवा गट क्रमांक | | अंदाजित संपादन क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|
| | | लागण क्षेत्र | पोट-खराबा क्षेत्र | एकूण क्षेत्र |
| १ | | २ | ३ | ४ |
| | | हे. आर | हे. आर | हे. आर |
| ३१ पै. | .. | ० ११ | ० ०० | ० ११ |



वि (एच) ३०६

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : वाघूर प्रकल्प धरण विभाग, जळगाव

**प्रकल्प कार्याचे वर्णन** : मौजे रामपूरा, तालुका जामनेर, जिल्हा जळगाव येथील जमिनी वाघूर प्रकल्पाच्या जलाशयासाठी संपादन.

**समाजाला मिळणारे लाभ** : सिंचनाचा लाभ

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन-** निरंक.

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश-** निरंक.

(१) प्रस्तावित संपादनाखालील उक्त शेत जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी कार्यालय, जळगाव भाग, जळगाव व कार्यकारी अभियंता, वाघूर धरण विभाग, जळगाव यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

(२) उक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून तर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक उल्लेख केलेल्या जमिनीचा कोणत्याही व्यक्तीने व्यवहार करू नये किंवा सदर जमिनीवर बोजा व अडथळा करू नये.

(३) संबंधित तलाठी यांनी संबंधित ७/१२ उताऱ्यावर संपादनाबाबत नोंद घ्यावी.

(४) दुय्यम निबंधक, चाळीसगाव यांनी संपादनाखालील गटाच्या खरेदी-विक्रीवर निर्बंधाबाबत कायद्यानुसार कार्यवाही करावी.

**अभिजीत राऊत,**
जिल्हाधिकारी तथा
समुचित प्रशासन, जळगाव.

जळगाव, २२ नोव्हेंबर २०२१.

---

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ नुसार प्राथमिक अधिसूचना.**

**जिल्हा जळगाव**

क्रमांक भूसंपादन/मौजे शिरसोली, दापोरे/एसआर/१८६/२०१७.— ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड-ए)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त जमिनी'' असा करण्यात आला आहे) उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबतच्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींनुसार याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(४)* नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनींवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनींच्या अथवा त्यांच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून, अशा मालकास उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार, जिल्हाधिकारी, जळगाव, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप-नियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेख्याच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे ;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग, जळगाव यांस पदनिर्देशित करीत आहे.

सदर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश क्रमांक साशा/भूसंपा./जळ./कावि/१८६/२०१७, दिनांक १ जून २०१९ अन्वये भूसंपादन करण्याकामी प्राधिकृत केले होते. तथापि, भूसंपादन संस्थेच्या (मध्य रेल्वे भुसावळ) यांच्या विनंतीनुसार व मा. जिल्हाधिकारी यांचेकडील आदेशानुसार सदर प्रस्ताव भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या प्रचलित कायद्यातील तरतुदींनुसार संपादित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनींचे वर्णन**

**जिल्हा जळगाव, तालुका जळगाव**

| भूमापन किंवा गट क्रमांक | | अंदाजित संपादन क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| **गाव शिरसोली** | | |
| ६९९ पै. | .. | ० १४ |
| ७०३ पै. | .. | ० ३६ |
| ७०४ पै. | .. | ० ०५ |
| ७०८ | .. | ० ०२ |
| ७०९/१ पै. | .. | ० १५ |
| ७०९/२ पै. | .. | ० २६ |
| ७१० पै. | .. | ० ०४ |
| **गाव दापोरा** | | |
| १०२ पै. | .. | ० ४९ |
| १०३ पै. | .. | ० १९ |
| १०४ पै. | .. | ० २४ |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : जळगाव ते मनमाड ३ री रेल्वे लाईन

**प्रकल्प कार्याचे वर्णन** : जळगाव ते मनमाड ३ री रेल्वे लाईन

**समाजाला मिळणारे लाभ** : दळणवळण

**अनुसूची - तीन**

विस्थापन नाही.

**अनुसूची - चार**

जळगाव ते मनमाड ३ री रेल्वे लाईन साखळी क्रमांक २६०.१८० ते ४१९.९९ कि .मी. चा भूसंपादन प्रस्ताव, १८६/२०१७, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार-अ, दिनांक २३ एप्रिल २०२१, पृष्ठ क्रमांक ५ ते ६ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : निरंक.

**(ब)** प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक.

**(क)** ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : निरंक.

**टीप.—**

(१) प्रस्तावित संपादनाखालील उक्त जमिनींच्या आराखड्याचे निरीक्षण उपविभागीय कार्यालय, जळगाव भाग, जळगाव तसेच उपमुख्य अभियंता (बांधकाम), मध्य रेल्वे भुसावळ, तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

(२) उक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून तर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक अधिसूचनेत उल्लेख केलेल्या जमिनींचा कोणत्याही व्यक्तीने व्यवहार करू नये किंवा सदर जमिनींवर बोजा व अडथळा करू नये.

(३) संबंधित तलाठी यांनी संबंधित ७/१२ उताऱ्यावर संपादनाबाबत नोंद घ्यावी.

(४) दुय्यम निबंधक, जळगाव यांनी संपादनाखालील गटाच्या खरेदी-विक्रीवर निर्बंधाबाबत कायद्यानुसार कार्यवाही करावी.

(५) संपादनाखालील जमिनींच्या संपादनाबाबत काही हरकती असल्यास अधिसूचना प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत इकडेस लेखी स्वरूपात हरकती दाखल करण्यात याव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार करण्यात येणार नाही.

**अभिजीत राऊत,**
जिल्हाधिकारी
तथा समुचित प्रशासन, जळगाव.

जळगाव, २२ नोव्हेंबर २०२१.

## मुख्याधिकारी, नगरपंचायत यांजकडून

### साक्री नगरपंचायत, साक्री

**सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ३३/अजाक, दिनांक ११ डिसेंबर २०२० नुसार साक्री नगरपंचायत हद्दीतील वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून नवीन नावे देणेबाबत.**

क्रमांक नपाप्र/बां.वि/१५५२/२०२१.– सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३३/अजाक, दिनांक ११ डिसेंबर २०२० नुसार साक्री शहरातील रस्त्यांची व वस्त्यांची नावे ही जातीवाचक असल्याचे महाराष्ट्र सारख्या पुरोगामी राज्याला भूषणावह नसल्यामुळे राज्यात सामाजिक सलोखा सौहार्द वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने साक्री शहरातील वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून त्या नावांऐवजी नवीन नावे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | यापूर्वीचे जातीवाचक वस्त्यांची व रस्त्यांची नावे | बदल करण्यात आलेल्या वस्त्यांची व रस्त्यांची नवीन नावे |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | वंजारतांडा | संत सेवालाल महाराजनगर |
| २ | वंजार गल्ली | संत भगवानबाबा मार्ग |
| ३ | सोनार गल्ली | संत नरहर महाराज मार्ग |
| ४ | सुतार गल्ली | संत विश्वकर्मा मार्ग |
| ५ | गवळीवाडा | श्रीकृष्णानगर |
| ६ | भोई गल्ली | संत भीमा महाराज मार्ग |
| ७ | कुंभार गल्ली | संत गाडगेबाबा महाराज मार्ग |
| ८ | कासार गल्ली | संत अकडोजी महाराज मार्ग |
| ९ | गढी भिलाटी | संत एकलव्यनगर |
| १० | कोकणी कॉलनी | कंसरा मातानगर |
| ११ | बोरबंद भिलाटी | संत शबरी मातानगर |
| १२ | आयसर भिलाटी | संत बिरसा मुंडानगर |
| १३ | मिल भिलाटी | संत खाज्या नाईकनगर |
| १४ | शिंपी गल्ली | संत नामदेव महाराज मार्ग |

**देवेंद्रसिंग गोपालसिंग परदेशी,**
मुख्याधिकारी,
साक्री नगरपंचायत, साक्री, जिल्हा धुळे.

साक्री, २६ नोव्हेंबर २०२१.

## प्रादेशिक सहसंचालक (साखर) तथा सहनिबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### आदेश

क्रमांक प्राससं/नियमन/श्री केदारेश्वर/पोनिदु/मंजुरी/१०६२/सन २०२१.– ज्याअर्थी, संघर्षयोद्धा बबनराव ढाकणे **श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड,** सुमननगर, पोस्ट बोधेगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर या कारखान्याच्या दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभेतील संमत ठराव क्रमांक ८ नुसार तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक ससाका-२०२०/प्र. क्र. ८५/३-स, दिनांक १८ मे २०२१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मी, मिलिंद भालेराव, प्रादेशिक सहसंचालक (साखर) तथा सहनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १३ *(२)* तसेच त्याखालील नियम, १९६१ चे नियम १२ अन्वये प्राप्त अधिकारांनुसार खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

| **उपविधी क्रमांक** | | **आदेश** |
|---|---|---|
| आदर्श उपविधी क्रमांक १ | .. | सोबत जोडलेल्या पुरवणी क्रमांक ४ नुसार मंजूर |

### पोट-नियम दुरुस्ती तक्ता नंबर ४

(पोट-नियम दुरुस्तीची शब्द योजना पुढीलप्रमाणे)

| **पोट-नियम नंबर** | | **दुरुस्तीनंतर अस्तित्वात येणारा पोट-नियम** |
|---|---|---|
| ६ | .. | **भागभांडवल** : संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रुपये १००५० लाख असून ते प्रत्येक भागाची रुपये १५००० दर्शनी किमतीचे ६७००० भागात विभागलेले असेल.<br><br>भागाची दर्शनी किंमत प्रत्येकी रुपये १५००० असेल. सभासदत्वाच्या अर्जासोबत रुपये १५००० आणि प्रवेश फी रुपये १०० प्रत्येकी भागापोटी जमा केल्यानंतर सभासदांना भाग दाखला देण्यात यावा. |
| ७ | .. | कारखान्याने विक्रीस काढलेले भाग भांडवल खालीलप्रमाणे असेल.<br><br>(अ) प्रत्येकी रुपये १५००० दर्शनी किमतीचे १४००० भाग उत्पादक सभासदांमध्ये विभागलेले रुपये २१०० लाख.<br><br>(ब) प्रत्येकी रुपये १५००० दर्शनी किमतीचे ३००० भाग संस्था भागामध्ये विभागलेले रुपये ४५० लाख.<br><br>(क) प्रत्येकी रुपये १५००० दर्शनी किमतीचे ५०००० भाग परतफेडीच्या अग्रहक्काच्या भागामध्ये विभागलेले रुपये ७५०० लाख. |
| १७ (अ)(३)(६) | .. | त्याने कमीत कमी एका भागाची मागणी केली पाहिजे व पोट-नियम ६ प्रमाणे प्रत्येक भागापोटी किमान रुपये १५०० भरले पाहिजेत. |
| १७ (ब)(५) | .. | संस्थेने कमीत कमी एक भाग तरी मागितलेला पाहिजे व पोट-नियम ६ प्रमाणे प्रत्येक भागापोटी किमान रुपये १५००० भरले पाहिजे. |

या कार्यालयाचे ज्ञापन जावक क्रमांक प्रासस/नियमन/श्री केदारेश्वर/पोनिदु/मंजुरी/१०६२/सन २०२१, दिनांक २५ ऑक्टोबर २०२१ अन्वये पोट-नियम ६, ७, १७-अ, (३) (vi)] १७-ब/५ मंजूर असे.

**मिलिंद भालेराव,**
प्रादेशिक सहसंचालक (साखर) तथा सहनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर.

अहमदनगर, २५ ऑक्टोबर २०२१.

## सहायक निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

**वाचावे.—** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३ (४)

(२) या कार्यालयाचा आदेश जावक क्रमांक आस्था/आदेश/अवसायन/बदल/नापत/गृनि/२०१९, दिनांक १ फेब्रुवारी २०१९

### आदेश

क्रमांक आस्था/आदेश/अवसायक/बदल/नापत/५६५/सन २०१९.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०३ (४) अन्वये अवसायकाचे नेमणुकीबाबत बदल करण्याचा अधिकार निबंधकास आहेत आणि उपरोक्त वाचावे क्रमांक २ अन्वये खालील तपशीलात नमूद संस्थेवर अवसायकांची नेमणूक करण्यात आली आहे.

त्याअर्थी, मी, रणजित म. पाटील, सहायक निबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार असा आदेश देतो की, खालील नमूद संस्थांचे अवसायनाचे कामकाज गतिशील होण्यासाठी खालील तपशीलात नमूदप्रमाणे संस्थेवर नवीन अवसायकाची नेमणूक करीत आहे.

| अवसायनात काढलेल्या संस्थेचे नाव | पूर्वीच्या अवसायकाचे नाव व पदनाम | नवीन नेमणूक केलेल्या अवसायकाचे नाव व पदनाम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| कै. वेडुभाऊ गोविंदभाऊ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, नंदुरबार, तालुका जिल्हा नंदुरबार. | ए. डी. पावरा, तत्कालीन तालुका लेखापरीक्षक अधीन जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, नंदुरबार. | आर. डी. राजपुत, विभागस्तरीय अवसायक पॅनलवरील अ.क्र. १ तथा प्रमाणित लेखापरीक्षक, नंदुरबार. |

वर नमूद केलेल्या नवीन नियुक्त अवसायकांनी सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरित करून संस्थेचा संपूर्ण पदभार पूर्वीच्या अवसायकांकडून घेऊन अवसायकाचे कामकाज त्वरित सुरू करावे व पदभार यादीसह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**रणजित म. पाटील,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, नंदुरबार.

नंदुरबार, १८ मे २०२१.

---

## सहायक निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### आदेश

क्रमांक आस्था/नों.रद्द/२०२/सन २०२१.– मी, अर्चना सौंदाणे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, इगतपुरी, जिल्हा नाशिक मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार इगतपुरी / त्र्यंबकेश्वर तालुक्यातील खालील सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करीत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | नोंदणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | पुजा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, इगतपुरी | एनएसके/आयपीआय/एचएसजी/टीसी/१३८३/सन २००४, दिनांक २९ मे २००४. |
| २ | सिद्धीविनायक गृहनिर्माण सहकारी संस्था, त्र्यंबकेश्वर | एनएसके/आयपीआय/जीएनएल/१३३५/सन २०१३, दिनांक २५ मार्च २०१३. |
| ३ | न्यु ब्रम्हगिरी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, त्र्यंबकेश्वर | एनएसके/आयपीआय/जीएनएसएल/१३०१/सन २०११, दिनांक १८ ऑगस्ट २०११. |

सदरचा आदेश आज दिनांक १२ मार्च २०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**अर्चना सौंदाणे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, इगतपुरी, जिल्हा नाशिक.

इगतपुरी, १२ मार्च २०२१.

---

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून

### आदेश

क्रमांक बी-१/२१४४/सन २०२१.- श्रीमती श्रृती निलेश गंगवाल-शाह, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांना दिनांक १५ जून २०२१ ते दिनांक १७ जून २०२१ पावेतो अशी एकूण ३ दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्रीमती श्रृती निलेश गंगवाल-शाह यांना ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्रीमती श्रृती निलेश गंगवाल-शाह, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. मिलींद महादू निकम, ४ थे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती श्रृती निलेश गंगवाल-शाह, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे ह्या वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेल्या नसत्या, तर त्या ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

धुळे, १५ जून २०२१.

---

### आदेश

क्रमांक बी-१/२२५४/सन २०२१.- श्रीमती श्रृती निलेश गंगवाल-शाह, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांनी उपभोगलेली दिनांक ९ जून २०२१ व दिनांक ११ जून २०२१ रोजीची अशी एकूण २ दिवसांची नैमित्तिक रजा रद्द करून दिनांक ९ जून २०२१ ते दिनांक ११ जून २०२१ पावेतो अशी एकूण ३ दिवसांची अर्जित रजेस याद्वारे कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्रीमती श्रृती निलेश गंगवाल-शाह यांना ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात आले होते.

श्रीमती श्रृती निलेश गंगवाल-शाह, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. सतिष मधुकर आहेर, ६ वे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांचेकडे सोपविण्यात आला होता.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती श्रृती निलेश गंगवाल-शाह, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे ह्या वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेल्या नसत्या, तर त्या ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

धुळे, १९ जून २०२१.

---

### आदेश

क्रमांक बी-१/२३८६/२०२१.- श्री. अद्वैत दत्तात्रय क्षीरसागर, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांना दिनांक २३ जून २०२१ ते दिनांक २५ जून २०२१ पावेतो अशी एकूण ३ दिवसांची अर्जित रजा दिनांक २६ जून २०२१ (४ था शनिवार) व दिनांक २७ जून २०२१ (रविवार) रोजीचे सुट्टीस जोडून याद्वारे कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. अद्वैत दत्तात्रय क्षीरसागर यांना जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. अद्वैत दत्तात्रय क्षीरसागर, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. मिर्झा जावेद जाफर बेग, जिल्हा न्यायाधीश-४ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांचेकडे सोपविण्यात आलेला होता.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. अद्वैत दत्तात्रय क्षीरसागर, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

धुळे, २९ जून २०२१.

---

**आदेश**

क्रमांक बी-१/२४२०/सन २०२१.— श्री. शैलेश रंगनाथ उगले, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांना दिनांक ५ जुलै २०२१ ते दिनांक ९ जुलै २०२१ पावेतो अशी एकूण ५ दिवसांची अर्जित रजेस दिनांक ३ जुलै २०२१ (शनिवार), दिनांक ४ जुलै २०२१ (रविवार), दिनांक १० जुलै २०२१ (दुसरा शनिवार) व दिनांक ११ जुलै २०२१ (रविवार) रोजीचे सुट्टीस जोडून याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे. तसेच दिनांक २ जुलै २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १२ जुलै २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगीस याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. शैलेश रंगनाथ उगले यांना जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. शैलेश रंगनाथ उगले, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. अद्वैत दत्तात्रय क्षीरसागर, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. शैलेश रंगनाथ उगले, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

धुळे, २ जुलै २०२१.

---

**आदेश**

क्रमांक आस्था/रजा/२४९७/२०२१.— धुळे जिल्हा न्यायालयाचा कार्यालयीन आदेश पृष्ठांकन क्रमांक बी-१/२४२०/२०२१, दिनांक २ जुलै २०२१ अन्वये श्री. शैलेश रंगनाथ उगले, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांना दिनांक ५ जुलै २०२१ ते दिनांक ९ जुलै २०२१ पावेतो अशी एकूण ५ दिवसांची अर्जित रजेस दिनांक ३ जुलै २०२१ (शनिवार), दिनांक ४ जुलै २०२१ (रविवार), दिनांक १० जुलै २०२१ (दुसरा शनिवार) व दिनांक ११ जुलै २०२१ (रविवार) रोजीचे सुट्टीस जोडून याद्वारे मंजूर करण्यात आलेली होती.

श्री. शैलेश रंगनाथ उगले यांना जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांनी त्यांना दिनांक ८ जुलै २०२१ व दिनांक ९ जुलै २०२१ अशा २ दिवसांची मंजूर करण्यात आलेली अर्जित रजा रद्द होणेसाठी विनंती अर्ज सादर केलेला असल्याने त्यांना मंजूर करण्यात आलेल्या वरील कालावधीत ५ दिवसांच्या अर्जित रजेपैकी २ दिवसांची अर्जित रजा याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

धुळे, ८ जुलै २०२१.

---

**आदेश**

क्रमांक बी-१/२५२५/सन २०२१.— श्री. सुजीत अंबादास राठोड, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, दोंडाईचा यांना दिनांक १२ जुलै २०२१ ते दिनांक १७ जुलै २०२१ पावेतो अशी एकूण ६ दिवसांची अर्जित रजेस दिनांक १० जुलै २०२१ (दुसरा शनिवार), दिनांक ११ जुलै २०२१ (रविवार), दिनांक १८ जुलै २०२१ (रविवार) रोजीचे सुट्टीस जोडून याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे. तसेच दिनांक ९ जुलै २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १९ जुलै २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. सुजीत अंबादास राठोड यांना दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, दोंडाईचा या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, दोंडाईचा या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. सुजीत अंबादास राठोड, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, दोंडाईचा यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. संतोष लक्ष्मण वैद्य, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, शिंदखेडा यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. सुजीत अंबादास राठोड, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, दोंडाईचा हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, दोंडाईचा या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

**रियाजोद्दीन हाफीजोद्दीन मोहम्मद,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, धुळे.

धुळे, ९ जुलै २०२१.

---

## सहायक निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### नोंदणी रद्द आदेश

क्रमांक प्रशा-१/मधुकर पा.पु./क.२१/नों.र.आ./३६०/२०२१.- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चा कलम २१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, सर्जेराव कांदळकर, सहायक निबंधक, सहकारी संस्था, अकोले, जिल्हा अहमदनगर **मधुकर पाणीपुरवठा सहकारी संस्था मर्यादित,** सावरगावपाट, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर नोंदणी क्रमांक ९३२, दिनांक २४ जानेवारी १९९२ या संस्थेचे अवसायनाचे कामकाज कलम १०९ *(१)* नुसार संपुष्टात आलेले असल्यामुळे संस्थेची कलम २१ नुसार नोंदणी रद्द करीत आहे.

सदरचा आदेश हा आज रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सर्जेराव कांदळकर,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, अकोले,
जिल्हा अहमदनगर.

अकोले, ३० मार्च २०२१.

---

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून

### आदेश

क्रमांक बी-२/एमएच-२३१२/७९७ (१)/सन २०२१.— श्री. निलेश बी. पाटील, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार यांना दिनांक १९ एप्रिल २०२१ ते दिनांक ६ मे २०२१ पावेतो अशी एकूण १८ दिवसांची अर्जित रजा व दिनांक १० एप्रिल २०२१ च्या कार्यालयीन वेळेपूर्वीपासून ते दिनांक ७ मे २०२१ च्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. निलेश बी. पाटील, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबारया पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात आले होते.

श्री. निलेश बी, पाटील, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नंदुरबार यांचे वरीलप्रमाणे दिनांक १० एप्रिल २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपासून ते दिनांक ७ मे २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतोचा कार्यभार श्रीमती एस. ए. विराणी, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार यांनी सांभाळला होता.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. निलेश बी. पाटील, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

नंदुरबार, ७ मे २०२१.

---

### आदेश

क्रमांक बी-२/एमएच-२३१२/७९७ (२)/सन २०२१.— श्री. व्ही. एम. पथाडे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा यांना दिनांक १० मे २०२१ ते दिनांक १३ मे २०२१ पावेतो अशी एकूण ४ दिवसांची अर्जित रजा आणि दिनांक ७ मे २०२१ चे कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १७ मे २०२१ च्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी याद्वारे मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. व्ही. एम. पथाडे यांना जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. व्ही. एम. पथाडे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा यांचे वरीलप्रमाणे दिनांक ७ मे २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १७ मे २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतोचा कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. व्ही. एम. वैद्य, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा यांनी सांभाळावा.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. व्ही. एम. पथाडे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

नंदुरबार, ७ मे २०२१.

---

**आदेश**

क्रमांक बी-२/एमएच-२३१२/८४४/सन २०२१.— श्री. निलेश बी. पाटील, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार यांना दिनांक २५ मे २०२१ ते दिनांक २८ मे २०२१ पावेतो अशी एकूण ४ दिवसांची अर्जित रजा व दिनांक २४ मे २०२१ च्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक ३१ मे २०२१ च्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. निलेश बी. पाटील यांना २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नंदुरबार या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात आले होते.

श्री. निलेश बी. पाटील, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार यांचे वरीलप्रमाणे दिनांक २४ मे २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक ३१ मे २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतोचा कार्यभार श्रीमती एस. ए. विराणी, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार यांनी सांभाळावा.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. निलेश बी. पाटील, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नंदुरबार या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

**राजेश सुरजप्रसाद तिवारी,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार.

नंदुरबार, २४ मे २०२१.

---

## प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून

**आदेश**

क्रमांक बी-२/एमएच-२३१२/८३१/सन २०२१.- श्रीमती डी. व्ही. देढीया, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, शहादा यांना दिनांक ६ मे २०२१ ते दिनांक १८ मे २०२१ पावेतो अशी एकूण १३ दिवसांची वैद्यकीय रजा कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे दिनांक ६ मे २०२१ ते दिनांक १८ मे २०२१ कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. ए. आर. कल्हापुरे, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, शहादा यांनी सांभाळला होता.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती डी. व्ही. देढीया, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, शहादा ह्या वर नमूद केलेल्या कालावधीत वैद्यकीय रजेवर गेल्या नसत्या, तर त्या ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, शहादा या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

धुळे, २० मे २०२१.

---

## आदेश

क्रमांक बी-२/१०३५/सन २०२१.— श्री. ए. एस. भागवत, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांना दिनांक ५ जुलै २०२१ ते दिनांक १० जुलै २०२१ पावेतो अशी एकूण ६ दिवसांची परिवर्तित रजा व दिनांक २ जुलै २०२१ च्या कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १२ जुलै २०२१ च्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी याद्वारे कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. ए. एस. भागवत यांना तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. ए. एस. भागवत, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांनी सांभाळला होता.

श्री. ए. एस. भागवत, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांनी रजेवरून परत आल्यावर ते कामावर रूजू होण्यास पात्र असल्याबद्दलचे वैद्यकीय अधिकाऱ्यांचे स्वास्थ्य प्रमाणपत्र दिनांक १३ जुलै २०२१ रोजी सादर केले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. ए. एस. भागवत, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार हे वर नमूद केलेल्या कालावधीत परिवर्तित रजेवर गेले नसते, तर ते तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नंदुरबार या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

नंदुरबार, १३ जुलै २०२१.

---

## आदेश

क्रमांक बी-२/एमएच-२३१२/१०३६/सन २०२१.— श्री. व्ही. एम. वैद्य, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा यांना दिनांक १५ जुलै २०२१ ते दिनांक १७ जुलै २०२१ पावेतो अशी एकूण ३ दिवसांची अर्जित रजा याद्वारे मंजूर करण्यात येत आहे. तसेच त्यांना दिनांक १४ जुलै २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १९ जुलै २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. व्ही. एम. वैद्य यांना तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. व्ही. एम. वैद्य, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा यांचे वरीलप्रमाणे दिनांक १४ जुलै २०२१ कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १९ जुलै २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतोचे कालावधीत त्यांचे न्यायीक पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. व्ही. एम. पथाडे, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा यांनी सांभाळावा.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. व्ही. एम. वैद्य, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

**आशुतोष सुधाकरराव भागवत,**
प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
नंदुरबार.

नंदुरबार, १३ जुलै २०२१.

---

## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांजकडून

**वाचावे.—** (१) शासन निर्णय क्रमांक सीएसएल/१४९३१/११६२/सीआर-४७/१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट १९९३

(२) शासन अधिसूचना क्रमांक सीएसएल/१६०५/सीआर-१२०/१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट १९९७

(३) जनरल मैनेजर, दि नवापूर मर्कन्टाई को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार यांचेकडील पत्र दिनांक २८ जून २०२१.

### आदेश

क्रमांक वि-२/दि नवापूर मर्केन्टाई को-ऑप.बँक लि.नवापूर /का.क. १५६/२२६३/सन २०२१.- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून मी, प्रताप पाडवी, प्रभारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार या आदेशान्वये **दि नवापूर मर्कन्टाई को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,** नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम १०१, ९१ व कलम ९८ अन्वये प्राप्त झालेली वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार खालील अटींस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

### परिशिष्ट

| अ. क्र. | अधिकार प्रदान करावयाच्या अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान करावयाच्या अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. संजय वसंतराव शिंदे | सहायक व्यवस्थापक | वसुली अधिकारी | नंदुरबार जिल्हा |

**अटी :** (१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास, आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तत्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा, कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी कार्यालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमहा विहित नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार व सहायक निबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार यांना सादर करावी.

(४) वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्त झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी नमूद कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(६) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहांच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ६ जून २०१९ मध्ये निश्चित केलेल्या बँकेच्या नावाच्या मोहोरचा वापर करण्यात यावा.

(७) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हिल कोर्ट", "एक्झिक्युटिव्ह कोर्ट" या शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये) असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "**वसुली अधिकारी, दि नवापूर मर्कन्टाई को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,** नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार" असा फलक लावता येईल.

(९) वसुली अधिकारी यांनी पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे, त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसुली करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

(११) या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीचे परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसुली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाच मध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटिस/आदेश/घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

हा आदेश आज दिनांक ९ जुलै २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**अशोक चाळक,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नंदुरबार.

नंदुरबार, ९ जुलै २०२१.

---

## प्रभारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### आदेश

क्रमांक वि-१/कृउबास अक्कलकुवा/अशा प्र.मं./नि./२३५९/२०२१.— मी, प्रताप पाडवी, प्रभारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १५-अ *(१)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून या कार्यालयाचा प्रशासक मंडळ नियुक्तीचा आदेश क्रमांक जिउनिन/कृउबास/तळोदा/अ.प्र.मं./२०२१, दिनांक २९ जानेवारी २०२१ अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासक मंडळात खालील व्यक्तींचा समावेश करणेसाठी पुरवणी आदेश पारीत करीत आहे.

| अ.क्र. | व्यक्तींची नावे | संपूर्ण पत्ता | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. अमोल प्रल्हाद भारती | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| २ | श्री. विजय भिकाजी सुर्यवंशी | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ३ | श्री. भरत मक्कन चौधरी | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ४ | श्री. प्रल्हाद मोतीराम मराठे | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ५ | श्री. राजेश तुकाराम पाटील | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ६ | श्री. आकाश सतिष वळवी | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ७ | श्री. महेंद्र हिरालाल बागुल | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ८ | श्री. सुरेश झगडू इंद्रजित | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ९ | श्री. धनराज आनंदा मराठे | राहणार तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |

सदर बाजार समितीचा पदभार अशासकीय प्रशासक मंडळाने तत्काळ घ्यावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर आदेश आज दिनांक १२ जुलै २०२१ रोजी माझे सही-शिक्क्यानिशी दिला असे.

**प्रताप पाडवी,**
प्रभारी जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नंदुरबार.

नंदुरबार, १२ जुलै २०२१.

---

## आदेश

क्रमांक वि-१/कृउबास अक्कलकुवा/अशा प्र.मं./नियुक्ती/२०२१.— मी, प्रताप पाडवी, प्रभारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १५-अ *(१)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून कृषी उत्पन्न बाजार समिती, अक्कलकुवा, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार या बाजार समितीवर श्री. रणजित पाटील, सहायक निबंधक, सहकारी संस्था, अक्कलकुवा, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांचेऐवजी शासनाने मान्यता दिलेले खालील अशासकीय व्यक्तींचे प्रशासकीय मंडळ नियुक्ती करीत आहे.

| अ.क्र. | व्यक्तींची नावे | संपूर्ण पत्ता | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. जितेंद्र दौलतसिंग पाडवी | राहणार वाण्याविहीर, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| २ | कु. छाया मांगा वळवी | राहणार नवानागरमुठा, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ३ | श्री. तापसिंग शिवराम वळवी | राहणार रायपूर, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ४ | श्री. वसंत दुरनी वसावे | राहणार पेचरीदेव, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ५ | श्री. नरेश दिगंबर वसावे | राहणार कोराई, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ६ | श्री. रायसिंग माकत्या वळवी | राहणार दहेल, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ७ | श्री. रविंद्र मानसिंग पाडवी | राहणार पानबारा, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ८ | श्री. छत्तरसिंग के. पाडवी | राहणार काठी, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ९ | श्री. रमेश उरश्या वसावे | राहणार खापर, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| १० | श्री. करमसिंग बासरा पाडवी | राहणार ओलापाडा (भगदरी), तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| ११ | श्री. नटवर देवला पाडवी | राहणार कुवा, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| १२ | श्री. मंगलसिंग कोमा वळवी | राहणार खटवाणी, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| १३ | श्री. जगन बारक्या वळवी | राहणार गव्हाळी, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |
| १४ | श्री. पिरेसिंग भिमसिंग पाडवी | राहणार भगदरी, तालुका अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार | प्रशासक |

सदर बाजार समितीचा पदभार अशासकीय प्रशासक मंडळाने तत्काळ घ्यावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर आदेश आज दिनांक १२ जुलै २०२१ रोजी माझे सही-शिक्क्यानिशी दिला असे.

**प्रताप पाडवी,**
प्रभारी जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नंदुरबार.

नंदुरबार, १२ जुलै २०२१.

---

## सहायक निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### आदेश

क्रमांक वि-३/सनिश्री/नियो.स्वप्नरुप/सर्वसाधारण संस्था/नोंदणी/२४९/सन २०२१.– मी, विजयसिंह उत्तमराव लकवाल, सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर जाहीर करतो की, नोंदणी क्रमांक एएनआर/एसएमआर/जीएनल/(एस)/२८३८/२०२०-२०२१, दिनांक ३१ मार्च २०२१ अन्वये **नियोजित श्री स्वप्नरूप साकल्य सर्वसाधारण सहकारी संस्था मर्यादित,** निमगाव खैरी, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) चा कलम ९ *(१)* अन्वये नोंदविण्यात करण्यात आली असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १२ *(१)* नुसार संस्थेचे वर्गीकरण **सर्वसाधारण संस्था** असून उपवर्गीकरण **इतर संस्था** असे करण्यात येत आहे.

श्रीरामपूर, ११ मार्च २०२१.

---

### आदेश

क्रमांक वि-३/सनिश्री/नियो.गावकरी ग्रामीण बिगरशेती पतसंस्था/नोंदणी/४१८/सन २०२१.– मी, विजयसिंह उत्तमराव लकवाल, सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर जाहीर करतो की, नोंदणी क्रमांक एएनआर/एसएमआर/आरएसआर/(सीआर)/२८४७/२०२१-२२/२०२१, दिनांक २८ जून २०२१ अन्वये **नियोजित गावकरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित,** बेलगाव बु., तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) चा कलम ९ *(१)* अन्वये नोंदविण्यात करण्यात आली असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १२ *(१)* व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १० *(१)* नुसार संस्थेचे वर्गीकरण **साधन संपत्ती संस्था** असून उपवर्गीकरण **कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था** असे करण्यात येत आहे.

श्रीरामपूर, २८ जून २०२१.

---

### आदेश

क्रमांक वि-३/सनिश्री/नियो.श्रीदत्तम्हाडा/हाऊसिंग/नोंदणी/४६०/सन २०२१.– मी, विजयसिंह उत्तमराव लकवाल, सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर जाहीर करतो की, नोंदणी क्रमांक एएनआर/एसएमआर/एचएसजी/(टीसी)/२८१४/२०२०-२१/२०२०, दिनांक १३ जुलै २०२१ अन्वये **नियोजित श्री दत्त म्हाडा हाऊसिंग सहकारी संस्था मर्यादित,** श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) चा कलम ९ *(१)* अन्वये नोंदविण्यात करण्यात आली असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १२ *(१)* नुसार संस्थेचे वर्गीकरण **गृहनिर्माण संस्था** असून उपवर्गीकरण **भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था** असे करण्यात येत आहे.

**विजयसिंह उत्तमराव लकवाल,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

श्रीरामपूर, १३ जुलै २०२१.

---

## आयुक्त, वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### आदेश

क्रमांक कार्या-६ (२)/सुतगि/२२५८/सन २०२१.– महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्रमांक सीएसएल/१४९३/११६२/सीआर-४७/१५-सी, दिनांक ७ ऑगस्ट अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, शीतल तेली-उगले, आयुक्त, वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नागपूर याद्वारे

सातपुडा सहकारी सुत गिरणी मर्यादित, यावल, जिल्हा जळगाव या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०९ *(२)* च्या तरतुदीनुसार परीसमापनाची कार्यवाही बंद करीत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार याद्वारे, सातपुडा सहकारी सूत गिरणी मर्यादित, यावल, जिल्हा जळगाव या संस्थेची नोंदणी रद्द करीत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ च्या तरतुदीनुसार या संस्थेचे या आदेशाचे तारखेपासून विसर्जन झाले असे समजण्यात येऊन ही सूतगिरणी निगमनिकाय संस्था असण्याचे बंद होईल.

सदरहू आदेश आज दिनांक १४ मे २०२१ रोजी माझे सही-शिक्क्यानिशी पारीत करण्यात येत आहे.

**शीतल तेली-उगले,**
भा.प्र.से.,
आयुक्त,
वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य तथा
अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

नागपूर, १४ मे २०२१.

---

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून

### आदेश

क्रमांक बी-१/१७९७/२०२१.– श्री. राजू अशोक शिवरात्री, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री यांना दिनांक ३ मे २०२१ ते दिनांक ६ मे २०२१ पावेतो अशी एकूण ४ दिवसांची अर्जित रजा दिनांक २ मे २०२१ (रविवार) रोजीचे सुट्टीस जोडून याद्वारे मंजूर करण्यात येत आहे. तसेच दिनांक २ मे २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपासून ते दिनांक ७ मे २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. राजू अशोक शिवरात्री यांना सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. राजू अशोक शिवरात्री, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. राजेश शिवाजीराव वानखेडे, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. राजू अशोक शिवरात्री, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

**रियाजोद्दीन हाफीजोद्दीन मोहम्मद,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
धुळे.

धुळे, ७ मे २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.